**MHTH190020232022**

## न्यायनिर्णय

## (अधिघोषित दिनांक १६.०८.२०२३)

खालील मुद्दे माझ्या निर्णयाकरीता उद्भवतात. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २२.०२.२०२२ रोजी १२.३० वाजता, मौजे दाभोण, मुरबीपाडा, तालुका तलासरी, जिल्हा पालघर येथे आरोपीने तिच्या ताब्यात ५०० मिलीचे लंडन प्रीसनर चे १३ टीन असा दारुबंदीचा माल विनापरवाना ताब्यात बाळगण्याचा अपराध केला ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक १ व २ करीता</u> –**

२. अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने पंच संतोष हरीनाथ बनिया [सा.क्र.१], खबरी सपना प्रभाकर डोंगरे [सा.क्र.२] साक्षीदार जगदेव हरीभाउ ठाकरे [सा.क्र.३], साक्षीदार विनोद धाक्या वारंगडे [सा.क्र.४], साक्षीदार शत्रुघ्न विष्णू पवार [सा.क्र.५] व तपास अधिकारी एस. व्ही. भोये [सा.क्र.६] यांना तपासले. आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ अंतर्गत बयान घेतले असता त्याच्यावरती आरोप व पुरावा खोटे असल्याचे कथन केले.

३. पंच संतोष [सा.क्र.१] यांनी साक्ष दिली की, दिनांक २२.०२.२०२२ रोजी पोलीसांनी त्यांना वाणगांव पोलीस स्टेशनला बोलावले होते. त्यांनी त्यांची एका कागदावर सही घेतली. पंचनाम्यावर त्यांची सही आहे, परंतु, त्यतील मजकुर त्यांना माहित नाही.

४. खबरी सपना [सा.क्र.२] यांनी साक्ष दिली की, सन २०२२ मध्ये त्या वाणगांव येथे मपोशि म्हणून होत्या. दिनांक २२.०२.२०२२ रोजी कर्तव्यावर असतांना पोलीस अधिक्षक पालघर यांच्या आदेशान्वये वाणगांव पोलीस ठाण्यात ऑल आउट ऑपरेशन लावण्यात आले होते. त्या दरम्यान दुय्यम अधिकारी विशे यांच्या आदेशान्वये त्या, वारंगडे, पवार, कनोजा असे ते सरकारी वाहनाने डायल क्र. ११ एमएच–४८/सीसी–३४६६ ने वाणगांव पुर्व भागात पेट्रोलिंग करत होते. त्यांना गुप्त बातमी मिळाली की, दाभोण मोरबीपाडा येथे राहणाारी रामी बाबर तिच्या दुकानामध्ये देशी विदेशी बिअर व क्वार्टर दारु विक्री करत आहे. अशी बातमी मिळाल्याने ते दोन पंचांना बोलावून त्यांना घटनेबाबत सांगितले. त्यानंतर ते दाभोण मुरबीपाडा येथे गेले. तेथे आरोपीच्या किराणा दुकानाबाहेर आवाज दिला असता ती बाहेर आली. तिला तिचे नांव विचारले असता तिने रामी बाबर वय ६० वर्ष राहणार दाभोन मुरबीपाडा असे सांगितले. त्यांनी आरोपीस त्यांची झडती घेण्यास सांगितले असता तिने नकार दिला. त्यानंतर त्यांनी घराच्या दर्शनी दारातून प्रवेश केला असता तेथून त्यांना लंडन प्लीसनरच्या ५०० मिलीचे १३ टीन एकुण रुपये १,६२५/– किंमतीचा माल मिळून आला. ठाकरे यांनी पंचनामा केला. ५०० मिलीची बाटली सीए करीता वेगळी काढून त्यावर पंच व पोलीसांच्या सहया घेतल्या. त्यानंतर त्यांनी रिपोर्ट नि. १६ व १७ दिला. ते आरोपीस ओळखतात.

५. जगदेव [सा.क्र.३] यांनी साक्ष दिली की, दिनांक २२.०२.२०२२ रोजी ते वाणगांव येथे पोहवा. म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी कर्तव्यावर असतांना पोलीस अधिक्षक पालघर यांच्या आदेशान्वये वाणगांव पोलीस ठाण्यात ऑल आउट ऑपरेशन

लावण्यात आले होते. त्या दरम्यान दुय्यम अधिकारी विशे यांच्या आदेशान्वये ते, मपोशि डोंगरे, वारंगडे, पवार, कनोजा असे ते सरकारी वाहनाने डायल क्र. ११ एमएच–४८/सीसी–३४६६ ने वाणगांव पुर्व भागात पेट्रोलिंग करत होते. त्यांना गुप्त बातमी मिळाली की, दाभोण मोरबीपाडा येथे राहणाारी रामी बाबर म्हणजे तिच्या दुकानामध्ये देशी विदेशी बिअर व क्वार्टर दारु विक्री करत आहे. अशी बातमी मिळाल्याने ते दोन पंचांना बोलावून त्यांना घटनेबाबत सांगितले. त्यानंतर ते दाभोण मुरबीपाडा येथे गेले. तेथे आरोपीच्या किराणा दुकानाबाहेर आवाज दिला असता ती बाहेर आली. आरोपीला तिचे नांव विचारले असता तिने रामी बाबर वय ६० वर्ष राहणार दाभोन मुरबीपाडा असे सांगितले. त्यांनी आरोपीला त्यांची झडती घेण्यास सांगितले असता तिने नकार दिला. त्यानंतर त्यांनी घराच्या दर्शनी दारातून प्रवेश केला असता तेथून त्यांना लंडन प्लीसनरच्या ५०० मिलीचे १३ टीन एकुण रुपये १,६२५/– किंमतीचा माल मिळून आला. त्यांनी पंचनामा नि. १८ केला, मुद्देमाल पावती नि. १९ फाडली. ५०० मिलीची बाटली सीए करीता वेगळी काढून त्यावर पंच व पोलीसांच्या सहया घेतल्या व लाख सील केले. आरोपीला व मुद्देमाल ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आणले. आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला. ते आरोपीस ओळखतात.

६. विनोद [सा.क्र.४] यांनी साक्ष दिली की, दिनांक २२.०२.२०२२ रोजी ते वाणगांव येथे पो नाईक म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी कर्तव्यावर असतांना पोलीस अधिक्षक पालघर यांच्या आदेशान्वये वाणगांव पोलीस ठाण्यात ऑल आउट ऑपरेशन लावण्यात आले होते. त्याकरीता दुय्यम अधिकारी विशे यांच्या आदेशान्वये ते, ठाकरे, पोना पवार, पोना कनोजा, मपोशि डोंगरे, असे ते सरकारी वाहनाने वाणगांव पुर्व भागात पेट्रोलिंग करत होते. त्यांना गुप्त बातमी मिळाली की, दाभोण मोरबीपाडा येथे राहणाारी रामी बाबर तिच्या दुकानामध्ये देशी विदेशी बिअर व क्वार्टर दारु विक्री करत आहे. अशी बातमी मिळाल्याने ते त्याठिकाणी गेले व दोन पंचांना बोलावून त्यांना घटनोबाबत सांगितले. त्यानंतर ते दाभोण मुरबीपाडा येथे गेले. तेथे आरोपीच्या किराणा दुकानाबाहेर आवाज दिला असता ती बाहेर आली. आरोपीला तिचे नांव विचारले असता तिने रामी

बाबर वय ६० वर्ष राहणार दाभोन मुरबीपाडा असे सांगितले. त्यांनी आरोपीला त्यांची झडती घेण्यास सांगितले असता नकार दिला. त्यानंतर त्यांनी घराच्या दुकानात प्रवेश केला असता तेथून त्यांना एक खाकी बॉक्समध्ये महाराष्ट्र बनावटीची दारुचे ८० मिलीचे १३ टीन एकुण रुपये १,६२५/– चा माल मिळून आला. ठाकरे यांनी पंचनामा केला. आरोपीला व मुद्देमाल ताब्यात घेतले. ते आरोपीस ओळखतात.

७. शत्रुघ्न [सा.क्र.५] यांनी साक्ष दिली की, सन २०२२ मध्ये ते वाणगांव पश्चिम बीट येथे कार्यरत होते. दिनांक २२.०२.२०२२ रोजी कर्तव्यावर असतांना पोलीस अधिक्षक पालघर यांच्या आदेशान्वये वाणगांव पोलीस ठाण्यात ऑल आउट ऑपरेशन लावण्यात आले होते. पोहवा जयेश ठाकरे यांना गुप्त बातमी मिळाली की, दाभोण मुरबीपाडा येथे रामी बाबर तिच्या राहत्या घरी दारुची विक्री करत आहे. ठाकरे यांनी पंचाना बोलावून घेतले. त्याकरीता त्यांनी वाणगांव पुर्व भागात दुय्यम अधिकारी विशे यांच्या आदेशान्वये ते, ठाकरे, पोना वारंगडे, पोना कनोज, डोंगरे मपोशि असे सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करत होते. बातमीनुसार ते दाभोण मोरबीपाडा येथे गेले. आरोपीच्या किराणाच्या दुकानाबाहेर आवाज दिला असता ती बाहेर आली. आरोपीला तिचे नांव विचारले असता तिने रामी बाबर वय ६० वर्ष राहणार दाभोन मुरबीपाडा असे सांगितले. त्यांनी त्यांची झडती घेण्यास सांगितले असता तिने नकार दिला. त्यानंतर त्यांनी दर्शनी दारातून दुकानात प्रवेश केला असता तेथून त्यांना एक खाकी बॉक्समध्ये महाराष्ट्र बनावटीची दारुचे ८० मिलीचे १३ टीन एकुण रुपये १,६२५/– चा माल मिळून आला. त्यातून सीए करीता मुद्देमाल वेगळा काढून त्याला लाख मोहर सील केला. ठाकरे यांनी पंचनामा केला. आरोपीला व मुद्देमाल ताब्यात घेतले. ते आरोपीस ओळखतात.

८. तपास अधिकारी एस. व्ही. भोये [सा.क्र.६] यांनी साक्ष दिली की, दिनांक २२.०२.२०२२ रोजी वाणगांव दाभोन, सपाटपाडा येथे बंदोबस्त होता. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला आलो. तेव्हा त्यांना ठाणे अंमलदार यांनी सांगितले की,

गुरक्र. २०/२०२२ चा तपास त्यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यांनी गुन्हयाचे कागदपत्र ताब्यात घेतले. फिर्यादीचे अवलोकन केले. तपासाकरीता त्यांना फिर्याद, पंचनामा, मुद्देमाल पावती, लंडन प्रीसनरच्या प्रत्येकी ५०० मिलीचे एकुण १ सील केलेला जो सीए तपासणीकरीता व टीन व १२ टीन एका बॉक्समध्ये देण्यात आला होता. त्यांनी आरोपीला ४१(१)(ब) ची नोटीस नि. २३ दिली. त्यांनी साक्षीदारांचे टिपण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. काढलेला नमुना सीए प्रशिक्षणाकरीता सांताक्रुझ येथे पत्र निशाणी २४ प्रमाणे पाठवला. सीए अहवाल निशाणी २५ हस्तगत करुन प्रकरणात सामील केला. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपीने १३ टीन बेकायदेशीर ताब्यात बाळगले. ते आरोपीस ओळखतात.

७. अभिलेखावरील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केल्यावरुन दिसुन येते की, खबरी रेखा [सा.क्र.१] यांनी रिपोर्ट नि. १६ व १७ दाखल केला. अभियोगपक्षाने एकुण सहा साक्षीदार तपासले. केवळ पंच साक्षीदार संतोष [सा.क्र.१] हा स्वतंत्र साक्षीदार असुन त्याने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच इतर साक्षीदार हे पोलीस साक्षीदार आहेत. साक्षीदारांनी आरोपी कोणाला दारु विकत होती याबाबत काही सांगितले नाही. तसेच विकलेल्या दारुचा तपशिल व ग्राहकांचे नांव पुराव्यात आलेले नाही. ती सार्वजनिक ठिकाणी दारु विक्री करत होता याबाबत अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. म्हणून अभियोगपक्षाचा पुरावा हा मोघम स्वरुपाचा वाटतो. आरोपी ही दारु विक्री करत होती याबाबत संशय निर्माण होतो. म्हणुन संशयाचा फायदा आरोपीस मिळणे पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिले व मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत केला.

**आदेश**

१. आरोपी रामी बाबु बाबर यांना मुंबई दारु प्रतिबंधक कायदा कलम ६५(ई)च्या शिक्षापात्र आरोपातुन फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५५(१) अंतर्गत निर्दोष मुक्तता केली.

२. आरोपीचे जामीनपत्रे व बंधपत्रे रद्द करण्यात आले.

३. अपील कालावधीनंतर जप्त मुद्देमाल ५०० मिलीचे लंडन प्लीसनर चे १३ टीन राज्य उत्पादन शुल्क विभाग, यांच्याकडे योग्य विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये चा वैयक्तीक मुचलका बंधपत्र पुरवावेत.

DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI

Digitally signed by DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Date: 2023.08.21 13:17:00 +0530

डहाणू ( दि.म.गुलाटी)
दिनांक १६.०८.२०२३. न्यायदंडाधि कारी प्रथम श्रेणी, डहाणू.